**स्थायी निदेश क्र.२५**

**बांधकाम साहित्यात फ्लाय ॲश विटा/ फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमांची अंमलबजावणी करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र: नपाप्रसं/१-६/२००४/७८३/कक्ष ७**
**दिनांक : २८ ऑक्टोबर, २००४**

वाचा : १) शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्र.एफएआर १०२००४/१६०/प्र.क्र.२७/नवि-२०,दि. २७.२.२००४
२) शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्र.टीपीबी ४३०४/३७१/प्र.क्र.२४२/०४/नवि-११, दि. ६.९.२००४

संदर्भाधीन परिपत्रकान्वये बांधकाम साहित्यात फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमाची अंमलबजावणी करणेबाबत आवश्यक त्या सूचना नगरपरिषद, मुख्याधिकारी यांना निर्गमित केल्या आहेत. औष्णिक विद्युत केंद्राच्या १०० कि.मी. परिसरातील बांधकाम व रस्ते, पूल, फ्लाय ओव्हर बांधकामात फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर सक्तीने करणे व अशा बांधकामांसाठी स्पेसिफिकेशन्स, टेंडर व डॉक्युमेंट्स मध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे अनिवार्य केले आहे. केंद्र शासनाच्या या नियमांची अंमलबजावणी राज्यातील औष्णिक केंद्राच्या १०० कि.मी. परिसरात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २७.२.२००४ च्या परिपत्रकान्वये औष्णिक विद्युत केंद्राच्या १०० कि.मी.परिसरातील गृह निर्माण मंडळ, बांधकाम व्यावसायिक, बांधकाम संस्था यांनी एकूण बांधकामात वापरल्या जाणाऱ्या विटा, ब्लॉक्स आणि टाईल्सच्या खाली नमूद केलेल्या टक्केवारीप्रमाणे एकूण बांधकामात फ्लाय ॲश विटा, ब्लॉक्स, टाईल्स अथवा क्ले फ्लाय ॲश / सिमेंट फ्लाय ॲश विटा / ब्लॉक्स व टाईल्सचा बांधकामात वापर करणे अनिवार्य आहे असे नगरपरिषदांना कळविले आहे.

| एकूण बांधकामात फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर | औष्णिक विद्युत केंद्राच्या ५० कि.मी. परिसरातील अंमलबजावणीचा कालावधी | औष्णिक विद्युत केंद्राच्या ५० ते १०० कि.मी. परिसरातील अंमलबजावणीचा कालावधी |
|---|---|---|
| २५ टक्के | - | ३१.८.२००४ |
| ५० टक्के | ३१.८.२००४ | ३१.८.२००५ |
| ७५ टक्के | - | ३१.८.२००६ |
| १०० टक्के | ३१.८.२००५ | ३१.८.२००७ |

२. शासनाचे उपरोक्त सूचना विचारात घेता या स्थायी निर्देशाद्वारे नगरपरिषदांना खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेच्या सूचना देणेत येतात

अ) इमारत बांधकाम विषय

i) बांधकाम विषयक उपविधीत दुरुस्ती करुन फ्लाय ॲश विटांचा व त्या आधारीत साहित्य वापर अनिवार्य करावा.

ii) नगरपरिषद क्षेत्रात इमारत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इतर बांधकाम विषयक अटी समवेत खालील अट टाकणेत यावी.

``फ्लाय ॲश विटा, ब्लॉक्स, टाईल्स अथवा क्ले फ्लाय ॲश/सिमेंट फ्लाय ॲश विटा/ब्लॉक्स व टाईल्सचा बांधकामात वापर करावा, बांधकामात फ्लाय ॲश विटा, ब्लॉक्स, टाईल्स अथवा क्ले फ्लाय ॲश साहित्य वापरणेबाबत वास्तुविशारद (Architect) चे प्रमाणपत्र सादर न केल्यास इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही.``

iii) इमारतीस वापर परवाना देतांना, बांधकामधारकाने उपरोक्त नमूद अट क्र. अ (ii) प्रमाणे फ्लाय ॲशचा वापर बांधकामात केला आहे हे तपासावे. ज्या इमारती बांधकामात सदर अटींची पूर्तता केली नाही, त्या इमारतीस वापर परवाना देऊ नये.

ब) नगरपरिषदेमार्फत होणाऱ्या इतर बांधकामाबाबत

नगरपरिषद क्षेत्रात नगरपरिषदेमार्फत होणाऱ्या बांधकाम व रस्ते, पूल, फ्लाय ओव्हर पूल बांधकामात फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा बांधकामात वापर सक्तीने करणेसाठी अशा बांधकामासाठीच्या स्पेसिफिकेशन, टेंडर डॉक्युमेंट्स व करारनाम्यात खालील बदल करावेत.

i) बांधकामे पूल, फ्लाय ओव्हर पूल व अशी इतर बांधकामे ज्यात सिमेंट ब्लॉक्सच्या विटांचा वापर करता येणार आहे, अशा सर्व प्रकारच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांना फ्लाय ॲश आधारीत साहित्य विचारात घ्यावे.

ii) बांधकामात फ्लाय ॲश वापरणेबाबत व तसे न केल्यास अदा केले जाणार नाही अशी स्पष्ट अट ठेकेदार व नगरपरिषदेमध्ये होणाऱ्या करारनाम्यात अंतर्भूत करावी.

iii) अट क्र.२ ची पूर्तता ज्या ठेकेदारांनी केली नसेल त्या ठेकेदारास करारनाम्यातील अटींचा भंग केल्याबध्दल सदर कामाचे देयक अदा करु नये.

३. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ च्या तरतुदीप्रमाणे जो कोणी कायद्यातील तरतुदीची अथवा नियमांचे अथवा आदेशाचे अथवा सूचनांचे पालन करणार नाही त्यास ५ वर्षाचे तुरुंगवासाची अथवा रुपये १ लाख पर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते. सदर तरतूद विचारात घेता केंद्र शासनाच्या अधिसूचनेतील सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था / प्राधिकरणे / क्षेत्रिय कार्यालय इत्यादींवर वरीलप्रमाणे दंडनीय कार्यवाही होऊ शकते. हे लक्षात घेऊन शासनाचे फ्लाय ॲश वापराबाबतच्या सूचना / निर्देशाप्रमाणे नगरपरिषदांनी तात्काळ कार्यवाही सुरु करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा दर मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर अखेरचा पूर्तता अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्टातील विहित नमुन्यात दरवर्षी एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात संचालनालयास सादर करावा.

मा.आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने.

(संतोष देहेरकर)
सहाय्यक संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

## फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापर तिमाही अहवाल

| नगर परिषदेचे नांव | नगरपरिषद मुख्यालय पासून औष्णिक विद्युत केंद्र किती अंतरावर आहे | फ्लाय ॲश वापरा संदर्भात उपविधीत दुरुस्ती केली आहे का? | उपविधीत सुधारणा केल्यानंतर किती इमारतींना बाधकाम परवानगी दिल्या आहेत. | ४ पैकी किती इमारत परवानगी मध्ये फ्लाय ॲश वापराबाबत अट समाविष्ट केली आहे. | रकाना ५ पैकी किती इमारत बांधकाम धारकांनी फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापराबाबतची अटीची पूर्तता केली आहे. | | | | | बांधकामे / पूल/ फूटपाथ तसेच अशी बांधकामे जेथे सिमेंट ब्लॉक वापरले जाणार आहेत, अशा किती कामाच्या निविदा मागविल्या आहेत | रकाना ७ पैकी किती बांधकामाच्या करारनाम्यात फ्लाय ॲश वापरण्याची अट टाकली आहे. | रकाना ८ पैकी किती बांधकामात फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापराबाबतच्या अटींची पूर्तता केली आहे. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकूण बांधकामाच्या १०० टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेल्या इमारती | एकूण बांधकामाच्या ७५ ते १०० टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेल्या इमारती | एकूण बांधकामाच्या ५० ते ७५ टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेल्या इमारती | एकूण बांधकामाच्या २५ ते ७५ टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेल्या इमारती | एकूण बांधकामाच्या २५ टक्केपेक्षा कमी फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेल्या इमारती | | | एकूण बांधकामाच्या १०० टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेली बांधकामे | एकूण बांधकामाच्या ७५ ते १०० टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेली बांधकामे | एकूण बांधकामाच्या ५० ते ७५ टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेली बांधकामे | एकूण बांधकामाच्या २५ ते ७५ टक्के फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरले------ ------------ ------------ ------------ --------ली बांधकामे | एकूण बांधकामाच्या २५ टक्केपेक्षा कमी फ्लाय ॲश आधारीत साहित्य वापरलेली बांधकामे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६अ | ६ब | ६क | ६ड | ६इ | ७ | ८ | ९अ | ९ब | ९क | ९ड | ९इ |
| | | | | | | | | | | | | | | | | |